# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## राष्ट्रीय सेवा योजना

जावक क्र 481/18 दि. 14/09/18

प्रति,

मा.प्राचार्य / रासेयो कार्यक्रम अधिकारी ( जिल्हा–गडचिरोली)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित
सर्व रासेयो महाविद्यालये.

**विषय : 'आव्हान'–आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व प्रजासत्ताक दिन पथसंचलन पूर्व प्रशिक्षणाकरिता जिल्हास्तरीय रासेयो निवड शिबीरात सहभागी होण्याबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, दिल्ली येथे राष्ट्रीय व मुंबई येथे राज्यस्तरावर संपन्न होणाऱ्या प्रजासत्ताक (२६ जानेवारी २०१९) दिन पथसंचलनात सहभाग घेण्याकरीता पथसंचलन पूर्व प्रशिक्षण रासेयो जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबीर आयोजित करून स्वयंसेवक विद्यार्थ्यांची निवड करावयाची आहे. तसेच जून २०१९ मध्ये होणाऱ्या 'आव्हान'–आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीरासाठीही स्वंयसेवकांची निवड याच शिबीरातून करावयाची आहे.

उपरोक्त जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबीराचे आयोजक रासेयो विभाग, जे. एस. पी. एम महाविद्यालय धानोरा जिल्हा–गडचिरोली हे असून सदर शिबीर महिला महाविद्यालय, गडचिरोली दिनांक २१ सप्टेंबर २०१८ रोज शुक्रवारला सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

या निवड शिबीरात सहभागी होण्यासाठी विद्यापीठाच्या रासेयो कार्यपुस्तीकेत पृष्ठ क्र. १४ व १५ मध्ये नमुद केलेल्या नियम व अटींच्या अधिनस्त आपल्या महाविद्यालयातील ०२ रासेयो स्वंयसेवक व ०२ रासेयो स्वंयसेविकेंची महाविद्यालय स्तरावर निवड करून नियोजित स्थळी दिलेल्या वेळेवर शिबीरात सहभागी करून सहकार्य करावे; ही विनंती.

धन्यवाद!

**शिबीर स्थळ : महिला महाविद्यालय,गडचिरोली** **दि. २१ सप्टेंबर २०१८ रोज शुक्रवार**

टीप: ०१) प्रजासत्ताक दिन पथसंचलन पूर्व प्रशिक्षणाकरीता स्वयंसेवकाचे रासेयोतील दुसरे वर्ष अनिवार्य आहे.
०२) आव्हान–२०१९ करीता प्रथम व व्दितीय वर्षातील रासेयोचे स्वयंसेवक सहभागी होऊ शकतात.
०३) सहभागी विद्यार्थ्यांसोबत सहभागाबाबतचे महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे पत्र असावे.
०४) स्वंयसेवकांचा प्रवास खर्च हा महाविद्यालयीन नियमीत रासेयो अनुदानातून करावा.
०५) सहभागी स्वयंसेवकांच्या अल्पोपाहाराची व्यवस्था केलेली आहे.

मा. प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी रासेयो संलग्नीत सर्व महाविद्यालये जिल्हा-गडचिरोली उपरोक्त प्रमाणे महाविद्यालय स्तरावर स्वयंसेवक व स्वयंसेविकांची निवड करून

डॉ. नरेंद्र तु. आरेकर
रासेयो, जिल्हा समन्वयक,
जिल्हा– गडचिरोली

भ्रमणभाष: ९४२२७३१०८३, ७५८८७७२९६० ई–मेल: narenarekar@gmail.com

जिल्हास्तरीय निवड शिबिरात रासेयो स्वयंसेवकांना सहभागी करावे

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना,
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली